नि.दि.दावा क्र. ३२/२०२३
सुशिला वि. सहदेव
निशाणी क्र. ४२

वादीतर्फे साक्षीदार क्र.१
मी शपथेवर सांगतो की,

उलटतपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी.टी.गजवे यांच्यातर्फे शपथेवर सुरु-

३. ज्यावेळेस मी दावा दाखल केला त्यावेळेस मी कोणत्याही ग्रामपंचायतीचा सदस्य नव्हतो. सुशिलाबाई बोरकर या ग्रामपंचायत सदस्या दावा दाखल करतांनी होत्या. आज रोजी वादींपैकी कोणीही ग्रामपंचायत सदस्य नाही. दावा मिळकत सर्वे नं.१३४/१अ ही आज रोजी ग्रामपंचायतीच्या मालकीची आहे. सर्वे नं. १३४/१ब ही आज रोजी हरदास ताराचंद ठाकरे यांच्या मालकीची आहे. हे म्हणणे खरे आहे की वरील दोन्ही मिळकतींमध्ये वादीपैकी कोणीही मालक नाही. हे म्हणणे खरे आहे की दोन्ही मिळकतींमध्ये जर अतिक्रमण झाल्यास, अतिक्रमण काढण्याचा वादींना मालक नसल्यामुळे अधिकार नाही. प्रतिवादी क्र. १ यांनी सर्वे नं. १३४/१अ आणि १३४/१ब अतिक्रमण केले हे दाखविण्याकामी, तहसिलदार यांचे पत्र मी या दाव्यात दाखल केले आहे. दावा दाखल करतांना, प्रतिवादी क्र. १ ने अतिक्रमण केले आहे हे दर्शविणारा नकाशा दाव्यासोबत दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१ ने अतिक्रमण केले नसल्याने खोटा दावा दाखल केला आहे. मी अतिक्रमण दाखविण्याकामी नि.६८ वर मोजणी नकाशा दाखल केलेला आहे. हे महणणे खरे आहे की मी नि.६८ वरील मोजणी करण्याकामी अर्ज केलेला नव्हता. मी मोजणी करतांना प्रत्यक्ष हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की मोजणी ही दिनांक २३/१०/२०१९ रोजी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की दावा हा २०१५ मध्ये दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की २०१९ पुवी अतिक्रमण केल्याबाबतचा मोजणी नकाशा नव्हता. हे म्हणणे खरे आहे की मी दावा दाखल करतांनी, प्रतिवादी क्र.१ ने अतिक्रमण केले हे दाखविण्याकामी कोणताही नकाशा नव्हता. न्यायालयात मी मोजणी करण्याकामी अर्ज केलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की मोजणी नकाशा नि.६८ मध्ये दाखविलेले अतिक्रम, अ,ब,क,ड हे सर्वे नंबर १३४/१ब च्या हद्दीत उत्तरेकडील बाजुला आहे. हे म्हणणे खरे आहे की १३४/१ब मध्ये पाण्याची टाकी आहे. हे म्हणणे खरे नाही की त्याचे बाजुला ग्रामपंचायत आहे. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपंचायतीच्या बाजुला लोकांची घरे आहेत. आबादी जागेतील मोकळी जागा ही सार्वजनिक कामासाठी/ मुलांसाठी खेळण्यासाठी राखिव असल्याबाबत मी कोणताही पुरावा दाखल केला नाही. मी कोराड येथे प्रतिवादी क्र.१ च्या घरापासुन अंदाजे पाचशे फुट अंतरावर राहतो. हे म्हणे खरे आहे की मला माझ्या घराकडे जाण्या-येण्यासाठी जागा उपलब्ध आहे. हे म्हणणे खरे नाही की सध्या गावामध्ये, लोकांसाठी समाज भवन बनविण्यात आले आहे. हे म्हणणे खरे

नाही की प्रतिवादी क्र.२ ते ९ यांच्या विरुद्ध राजकिय द्वेषाच्या भावनेने प्रतिवादी क्र.१ विरुद्ध खोटा दाखल दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१ ने कोणतेही अतिक्रमण केले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2024.12.04 17:20:40 +0530

दिनांक ०२.१२.२०२४ (एस.एम. सरोदे)

रामटेक दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)